**आहिल्यानगर महानगरपालिका,आहिल्यानगर-४१४००१**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक आहिल्यानगर महानगरपालिका**

नगरसचिव कार्यालय
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड,
आहिल्यानगर महानगरपालिका,
आहिल्यानगर-४१४००१.

मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेले मा.प्रशासक यांजकडेस निर्णयार्थ सादर करावयाचे विषय.

कार्यसूची :- ५७

दिनांक - १८/०८/२०२५ वेळ - दुपारी ०५.०० वा.

| अ.क्र | विषय क्र | विषय |
|---|---|---|
| १ | ५५२ | अहिल्यानगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहा करिता तसेच आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेले औषधे ,रसायने व वैद्यकीय साहित्य खरेदी बाबत करण्यात आलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत. |
| २ | ५५३ | अहिल्यानगर महानगरपालिका वसुली वॉर्ड क्रमांक ७ बिल क्र ४६०(Z२७०८१६९८) अर्जदार श्री दामोदर मारूती भोरे रा.आडतेबाजार , अहिल्यानगर यांचे अर्ज देवून बंद केलेल्या नळकनेक्शनचे बिल येत असल्याने सदर बिलावरील रक्कम रू.४५००/- निर्लेखित करणे बाबत. |
| ३ | ५५४ | अहिल्यानगर महानगरपालिका दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेकामी दुस-या संस्थेकडून कामकाज करून घेणेबाबत. |
| ४ | ५५५ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग ) व्यक्तींना उदरनिर्वाह अनुदान देणेसाठी यादीस मंजुरी बाबत. |
| ५ | ५५६ | १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रस्तावित कामे अंतर्गत अप्पू हत्ती चौक ते न्यु आर्टस कॉलेज पर्यत रस्त्याच्या बाजुने ५०० एम एम व्यासाची एम एस मुख्य जलवाहिनी टाकणचे कामी सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे बाबत. |
| ६ | ५५७ | अहिल्यानगर महानगरपालिका डॉ.अनिल बोरगे,वैद्यकीय आरोग्य अधिकारी (निलंबीत) यांचे विरूध्द क्रि.रिव्हिजन नं.५९ ऑफ २०२५ कामी ॲड.के.एम.देशपांडे यांची कोर्ट विभागामार्फत नेमणुक करणे बाबत. |

मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५२ — विषय क्र - ५५२

दिनांक:- १८ /०८/२०२५ — विभाग- स्टोअर विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहा करिता तसेच आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेले औषधे ,रसायने व वैद्यकीय साहित्य खरेदी बाबत करण्यात आलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहा करिता तसेच आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेले औषधे ,रसायने व वैद्यकीय साहित्य खरेदी बाबत ई निविदा प्रणालीचा अवलंब करून ई निविदा क्र २०२५_ANMC_११८०५५४_१ करण्यात आलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती मा.प्रशासकीय स्थायी समितीस अवलोकन झाले आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५३ — विषय क्र - ५५३

दिनांक- १८ /०८/२०२५ — विभाग- प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका वसुली वॉर्ड क्रमांक ७ बिल क्र ४६०(Z२७०८१६९८) अर्जदार श्री दामोदर मारूती भोरे रा.आडतेबाजार , अहिल्यानगर यांचे अर्ज देवून बंद केलेल्या नळकनेक्शनचे बिल येत असल्यान्र सदर बिलावरील रक्कम रू.४५००/- निर्लेखित करणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका वसुली वॉर्ड क्रमांक ७ बिल क्र ४६०(Z२७०८१६९८) अर्जदार श्री दामोदर मारूती भोरे रा.आडतेबाजार , अहिल्यानगर यांचे अर्ज देवून बंद केलेल्या नळकनेक्शनचे बिल येत असल्याने सदर बिलावरील रक्कम रू.४५००/- निर्लेखित करणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव, | मा.प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५४ विषय क्र - ५५४
दिनांक- १८/०८/२०२५ विभाग- घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेकामी दुस-या संस्थेकडून कामकाज करून घेणेबाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन निर्माण होणारा कचरा संकलन व वाहतून करणे कामी ई निविदा प्रक्रिया राबवून मे श्री.जी एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेस तीन वर्षाकरिता कार्यारंभ आदेश निर्ममीत करण्यात आलेले आहेत.

सदर ठेकेदार संस्थेची मुदत दिनांक १४/०२/२०२६ रोजी संपुष्टात येणार असून तत्पुर्वीच नव्याने निविदा प्रक्रिया राबवून पुढील तीन वर्षाकरिता मनपा हद्दीमध्ये निर्माण होणारा कचरा संकलन,वर्गीकरण व वाहतूक करणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणेकामी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ व पुरेशी साधनसामग्री उपलब्ध नाही. त्यामुळे ई - निविदा प्रक्रिया राबवून मे.श्री जी एजन्सीज अहमदाबाद या संस्थेस तीन वर्षाकरीता काम देण्यात आलेले आहे. त्यांचेकडेस ६२ घंटागाडया,७ कॉम्पॅक्टर मंजुर दरानुसार भाडेतत्वावर देण्यात आलेली आहेत. त्यांचे भाडे दरमहा देयकातून वसूल करण्यात येत आहे. सदर संस्था मनपाच्या व त्यांचेकडील वाहनांमधून कचरा वाहतूक करत आहेत. त्याकरिता ते मनपाची जागा वाहनतळ म्हणून वापर करत आहेत. सदर वाहनतळाचे देखील भाडे दरमहा देयकातून वसूल करण्यात येत आहे.

तथापी मे श्री.जी.एजन्सीज,अहमदाबाद यांचे कामाबाबत नागरिक व पदाधिकारी यांचे वारंवार प्राप्त होणा-या तक्रारीमुळे सदर संस्थेस अंतिम नोटिस बजावण्यात आलेली असून नोटीशीच्या अनुषंगाने खुलासा प्राप्त झाला असून सदर खुलासा अत्यंत मोघम स्वरूपाचा असून वस्तूस्थितीशी विसंगत व असमाधानकारक असल्यामुळे मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मे.श्री.जी.एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेकडून काम करून घेणे बाबत नमुद केले आहे.

तथापि सदर मे.श्री.जी एजन्सीज,अहमदाबाद या संस्थेने अचानक कुठल्याही स्वरूपाची पुर्वसूचना न देता दि.२९ जुलै २९ व ३० जुलै २०२५ रोजी अंशतः दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करणेचे काम बंद करण्यात आलेले आहे.

त्यामुळे संपुर्ण शहरामध्ये कच-याचे ढिग पडेलेले असून त्याबाबत शहरातील पदाधिकारी यांच्या तक्रारींच्या संख्या वाढल्या असून विविध संघटनांचे मोर्चे व निदर्शने यांचा सामना मनपा प्रशासनास करावा लागत आहे. त्यामुळे जनमाणसांमध्ये मनपाची प्रतिमा मलीन होत असून शहरातील नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

सद्यस्थितीमध्ये पावसाळयाचे दिवस सुरू असल्यामूळे साचलेल्या कच-यांच्या ढिगांमुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तातडीने पर्यायी व्यवस्था करून शहरातील साचलेला कचरा उचलणे आत्यावश्यक व क्रमप्राप्त आहे.

सद्यस्थितीमध्ये कार्यारत ठेकेदार संस्था मे. श्री.जी एजन्सीज, अहमदबाद यांना रक्कम रू.२३५०/- प्रति मे.टन याप्रमाणे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे मे.साईराज अर्थमुव्हर्स ,अहिल्यानगर या संस्थेने दैनंदिन कचरा संकलन व वाहतुक करणेकामी विनंती पत्र देवून सहमती दर्शविली असून सदर संस्थेने वजनावर काम कण्याची तयारी दर्शविली आहे.

तथापी, मनपा मार्फत नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून ई - निविदा प्रक्रिया पूर्ण होणेस कालावधी लागणार आहे. तोपर्यत सदरचे काम बंद ठेवल्यास शहरामध्ये मोठया प्रमाणामध्ये कचरा साचून आरोग्य विषयक अडचणी निर्माण होतील. त्यामुळे सदची बाब अत्यावश्यक व नागरीकांच्या अरोग्याशी निगडीत असल्यामुळे मे.साईराज अर्थमुव्हर्स,अहिल्यानगर या संस्थेस सध्या सुरू असणारी ई - निविदा अंतिम होवून नविन निविदाकार संस्थेस कार्यारंभ आदेश निर्गमीत होईपर्यत मे.साईराज अर्थमुव्हर्स या संस्थेस मागील संस्था मे.श्री.जी.एजन्सीज,अहमदाबाद यांचेशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सदरचे कामकाज देणेस व येणा-या खर्चास तसेच सदरचा खर्च मनपा मंजुर अर्थसंकल्प सन २०२५ -२६ मधील खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे या लेखाशिर्षामधून करणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५५ विषय क्र - ५५५
दिनांक- १८ /०८/२०२५ विभाग- NULM विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग ) व्यक्तींना उदरनिर्वाह अनुदान देणेसाठी यादीस मंजुरी बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग ) व्यक्तींची राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत नोंद घेण्यात आलेले दिव्यांग व्यक्तींना मासिक उदरनिर्वाह अनुदान देणेबाबत नोंदणी करण्यात आलेल्या व संगणकीकृत अपंग प्रमाणपत्र असणा-या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वाच्या टक्केवारीनुसार माहे जुलै २०२४ ते मार्च २०२५ अखेर अपंग (दिव्यांग ) व्यक्तींना उदरनिर्वाह अनुदान देणेसाठी प्रस्तावातील नमुद यादीस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव,
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५६ | विषय क्र - ५५६
दिनांक- १८ /०८/२०२५ | विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रस्तावित कामे अंतर्गत अप्पू हत्ती चौक ते न्यु आर्टस कॉलेज पर्यत रस्त्याच्या बाजुने ५०० एम एम व्यासाची एम एस मुख्य जलवाहिनी टाकणचे कामी सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिका १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रस्तावित कामे अंतर्गत अप्पु हत्ती चौक ते न्यु आर्टस कॉलेज पर्यत रस्त्याच्या बाजुने ५०० एम.एम.व्यासाची एम एस मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश मे.आरडे इलेक्ट्रीकल्स,अहिल्यानगर यांना देण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये सदरचे काम पूर्ण झाले असून, जलवाहिनी कार्यान्वित केली आहे. विषयांकीत काम करत असताना त्याठिकाणी असलेली भौतीक परिस्थिती पाहता काही बाबींचा परिमाण कमी झाला व काही बाबींचा परिमाण वाढवावी लागील. या कामाच्या अनुषंगाने रक्कम रूपये १०,५३,१५९/- च्या अतिरीक्त बाबींचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. परंतु ठेकेदार मे.आरडे इलेक्ट्रीकल्स यांनी काही कामांना नकार दिला. त्यामुळे अतिरिक्त कामांची स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार प्रस्तावित अतिरीक्त कामाचे अंदाजपत्रक रद्द करण्यात आले होते. यापुर्वी सदर कामाचे अंदाजपत्रकाची रक्कम रू. १,१५,२७,८४४(GST व्यतिरीक्त ) इतकी होती. नव्याने आवश्यक बाबी समाविष्ठ करून सुधारीत अंदाजपत्रक तयार केलेले असून त्याची रक्कम रू. १,१९,५४,२९९/- (GST व्यतिरीक्त होत आहे.) यामध्ये रू. ४,२६,४५५/- इतकी वाढ होत आहे. सदरचे काम पूर्ण करून घेणेसाठी बदल करणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने विषयांकीत कामाचे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,१९,५४,२९९/- (GST व्यतिरीक्त) च्या रकमेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव,
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५७**

मा.प्रशासक ठराव क्र. ५५७ | विषय क्र - ५५७
दिनांक- १८ /०८/२०२५ | विभाग- आरोग्य विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका डॉ.अनिल बोरगे,वैद्यकीय आरोग्य अधिकारी (निलंबीत) यांचे विरूध्द क्रि.रिव्हिजन नं.५९ ऑफ २०२५ कामी ॲड.के.एम.देशपांडे यांची कोर्ट विभागामार्फत नेमणुक करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, आरोग्य विभागामध्ये आर्थिक अपहार केले प्रकरणी आरोपी डॉ.अनिल बोरगे यांच्या विरूध्द फौजदारी दावा दाखल केलेला असून डॉ.अनिल अशोक बोरगे यांच्या विरूध्द १८९ बी.एन.एस.एस.प्रमाणे सोडुन देण्यात आली असे माननीय न्यायालय यांना कळविले होते. त्या अनुशंगाने मुळ फिर्यादी यांनी त्यांचे सविस्तर म्हणणे फौ. खरजा नं. ३६७/२०२५ कामी दाखल केले व आरोपी अनिल बोरगे यांचा गुन्हयामध्ये प्रथमदर्शनी सहभाग असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे दाखल १८९ चा अहवाल नामंजुर करण्यात यावा व अनिल बोरगे यास आरोपी करण्यात यावे असे सविस्तर म्हणणे दाखल केले होते. सदरचे लेखी म्हणणे वरून दि.१७/०६/२०२५ रोजी मा.न्यायालयाने भा.द.वि.कलम ४०९,४२० अस ३४ अन्वये इशु प्रोसेस केली आहे. सदरचा दि. १७/०६/२०२५ चा आदेश अर्जदार अनिल बोरगे यांनी आव्हानित केला आहे. त्यानुसार अहमदनगर येथील मा.प्रमुख जिल्हा न्यायालय व सत्र न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात क्रि.रिव्हिजन नं.५९ ऑफ २०२५ ने केस दाखल केली आहे.

सदर केस प्रकरणी मुळ फिर्यादी डॉ.सतिष राजुरकर (प्र.वैदयकीय आरोग्य अधिकारी ) यांचे वकीलपत्र शहरातील वकीलपत्र ॲड.के.एम.देशपांडे यांना देणे बाबत मा.आयुक्त यांनी निर्देश दिले होते. त्याप्रमाणे या प्रकरणी ॲड.के.एम.देशपांडे हे मनपाची बाजु मांडत असून त्यांची कोर्ट विभागामार्फत नेमणुक करणेस तसेच त्यांची सदर केस प्रकरणी होणारी फी कामी येणा-या खर्चास व केसबाबतची त्यांची वेळोवेळी त्यांच्या मागणीनुार होणारी व्यावसायीक फी अदा करणेस मा.प्रशासक यांची मान्यता देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव,
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका